सकाळ



इंचनाळ : मंगल व राकेश नाईक यांना रवळनाथतर्फे मदत देण्यात आली. यावेळी एम. एल. चौगुले, डॉ. आर. एस. निळपणकर, महेश मजती, डी. के. मायदेव आदी उपस्थित होते.

# इंचनाळच्या नाईक कुटुंबाला 'रवळनाथ' संस्थेचा आधार

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. २६ : इंचनाळ (ता. गडहिंग्लज) येथील मंगल नाईक यांचा मुलगा दीपक नाईक याचे कर्करोगामुळे निधन झाले. आर्थिक हालाखीतील या कुटुंबाला रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीच्यावतीने आर्थिक मदतीद्वारे आधार दिला. संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी गावात जाऊन नाईक कुटुंबाला तत्काळ मदत म्हणून १५ हजारांची रोख मदत दिली.

परराष्ट्र मंत्रालयाचे माजी सचिव ज्ञानेश्वर मुळे यांच्या चांगुलपणाच्या चळवळीतंर्गत हा उपक्रम राबविण्यात आला. श्रीमती मंगल नाईक यांच्याकडे ही मदत सुपूर्द करण्यात आली. नाईक कुटुंबाकडे दीपकच्या अंत्यविधीसाठीही पैसे नव्हते. ग्रामस्थांनी वर्गणी काढून दीपकवर अंत्यविधी केले. रवळनाथच्या तातडीच्या मदतीमुळे नाईक यांना आधार मिळाला. संचालक डॉ. आर. एस. निळपणकर यांनी महिनाभर पुरेल इतके धान्य नाईक कुटुंबाला दिले. दीपकच्या आजारपणातील खर्च व स्वत:चे हक्काचे घरही नसल्याने या कुटुंबाला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या मदतीमुळे दीपकची आई मंगल व भाऊ राकेश यांना आधार मिळाला आहे. संचालक महेश मजती, मीना रिंगणे, रेखा पोतदार, उमा तोरगल्ली, सीईओ डी. के. मायदेव, राकेश नाईक उपस्थित होते.